जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2019
पुढारी

# कोल्हापुरात रात्री १.२९ वाजता दिसले चंद्रग्रहण

## दुर्बिणीतून चंद्रग्रहण पाहण्यासाठी शिवाजी विद्यापीठात खगोलप्रेमींची गर्दी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

खंडग्रास चंद्रग्रहण पाहण्याचा बुधवारी पहाटे अनेकांना योग आला. कोल्हापूरच्या स्थानिक वेळेनुसार मंगळवारी मध्यरात्री १२ वाजून १३ मिनिटांनी पृथ्वीची चंद्रावर उपछाया पडण्यास प्रारंभ झाला. १ वाजून २९ मिनिटांनी पृथ्वीची मुख्य छाया चंद्रावर पडली अन् ग्रहणास प्रारंभ झाला. त्यानंतर हळूहळू पृथ्वीच्या छायेमुळे चंद्र झाकला गेला.

पहाटे ४ वाजून २९ मिनिटांनी ग्रहण संपले. ग्रहण स्थितीत चंद्राच्या निरीक्षणाचा विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. शिवाजी विद्यापीठीतील पदार्थ विज्ञान विभागाच्यावतीनेखंडग्रासचंद्रग्रहणाच्या छटा खगोलप्रेमींना अनुभवता याव्यात यासाठी या विभागाच्या इमारतीच्या टेरेसवर विद्यापीठातील सर्वात मोठी १२ इंची दुर्बीण लावण्यात आली होती. १४९ वर्षांनंतर गुरुपौर्णिमेदिवशी खंडग्रास चंद्रग्रहण पाहण्याचा योग आल्याने ग्रहण पाहण्यासाठी या ठिकाणी खगोलशास्त्राचे अभ्यासक, विद्यार्थी, शहरातील खगोलप्रेमींसह लहान मुलांनी गर्दी केली होती. मध्यरात्री १ वाजून २९ मिनिटांनी चंद्रग्रहणास प्रारंभ झाला. ढग गडद नसल्याने पृथ्वीची छाया चंद्रावर पडलेली पाहता आली. त्यावेळी चंद्राचा काही भाग काळा होत गेला. जसजशी पृथ्वीची छाया चंद्रावर पडली त्यावेळच्या स्थितीची माहिती प्रा. व्हटकर विद्यार्थ्यांना देत होते. ग्रहण स्थितीमध्ये चंद्राची निरीक्षणे पाहून अनेकांनी आनंद लुटला. दुर्बिणीबरोबरच थेट डोळ्यांनीही खंडग्रास चंद्रग्रहण पाहता आले. पहाटे तीन वाजता पृथ्वीची छाया चंद्राच्या निम्म्यापेक्षा जास्त भागावर होती. त्यामुळे चंद्र गडद काळ्या रंगाचा दिसत होता. त्यानंतर चंद्रावरील पृथ्वीची सावली हळूहळू कमी होत गेली. पहाटे ४ वाजून २९ मिनिटांनी चंद्रग्रहण समाप्त झाले. हे ग्रहण भारतासह युरोप, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अमेरिकेतील अनेक ठिकाणांहून पाहण्यात आले. भारतासह, पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन, सिंगापूर, फिलिपाईन्स, मलेशिया, इंडोनेशिया या आशियाई देशांमध्ये यावर्षीचे हे दुसरे चंद्रग्रहण आहे, असे प्रा. राजीव व्हटकर यांनी सांगितले.

**१४९ वर्षांनंतर असा योग**

चंद्रग्रहण हे नेहमीच पौर्णिमेला होत असते; पण तब्बल १४९ वर्षांनंतर आजच्या गुरुपौर्णिमेला खंडग्रास चंद्रग्रहणाचा योग आला होता.

**अंबाबाई मंदिरात धार्मिक विधी**

खंडग्रास चंद्रग्रहणानिमित्त करवीरनिवासिनी श्री अंबाबाई मंदिरात ग्रहण काळातील धार्मिक विधी पार पाडण्यासाठी रात्री पाऊण वाजता देवीचा गाभारा खुला करण्यात आला होता. यानंतर देवीची पूजा व काकडा करण्यात आला. पावसाळा असल्याने ढग येतील आणि ग्रहण पाहण्यात व्यत्यय येईल, अशी शंका होती. त्यामुळे उघड्या डोळ्यांनी ग्रहण पाहता येणार नाही, अशी शंका होती. पण ढग नसल्याने दुर्बिणीबरोबरच उघड्या डोळ्यांनीही अनेकांना या ग्रहणाचा आनंद घेता आला.

# डॉ. येवले यांनी पदभार स्वीकारला

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

'अन्य विद्यापीठांप्रमाणेच या विद्यापीठांमध्येही आव्हाने आहेत. विद्यापीठ केवळ 'ए' दर्जाचे असून, उपयोग नाही, येथून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी हा 'ए ग्रेड' घेऊन बाहेर पडला पाहिजे. विद्यापीठात शैक्षणिक दर्जा आणि शिस्तीशिवाय पर्याय नाही. आपल्याला जागतिकीकरणात टिकायचे असेल, तर आमूलाग्र बदल आवश्यक आहे,' असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी मंगळवारी केले.

डॉ. प्रमोद येवले यांनी मंगळवारी सकाळी डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली. 'विद्यापीठातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन कायापालट करण्याचा; तसेच नावलौकिक उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहोत. प्रत्येकाने आपापली जबाबदारी ओळखली, तर विद्यापीठाचा नावलौकिक उंचाऊ शकू. यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. इतर विद्यापीठांप्रमाणे येथेही अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे शासनावर अवलंबून न राहता आपणाला पर्यायी व्यवस्था निर्माण करावी लागेल,' असे डॉ. येवले म्हणाले.

दीड महिन्याच्या कार्यकाळात खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. सर्वांचे सहकार्य मनापासून मिळाले. शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाचे सर्वोच्च पद मिळणे हा माझा सन्मान होता, असे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2010
तरुण भारत

# पोलंडच्या विद्यार्थ्यांनी दिली विद्यापीठाला भेट

**कोल्हापूर :** पोलंडच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट देवून विविध विषयांची माहिती घेतली. तसेच अभ्यासक्रम आणि नोकरीच्या संधी यासंदर्भात अधिष्ठाता, डॉ. भारती पाटील यांनी माहिती दिली. कर्नल गायकवाड यांनी ही भेट घडवून आणली. यामध्ये २० विद्यार्थी व ३ शिक्षकांचा समावेश होता. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी व्यवस्थापन सदस्य अमित कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. प्रकाश कुंभार आदी उपस्थित होते.